# <u>सीता-स्वयंवर</u>

मिथिला नगरीचा राजा होता जनक. जनकाची लाडकी मुलगी होती सीता. ती सुंदर आणि गुणवती होती. जनकाने सीतेचे <u>स्वयंवर</u> मांडले होते. त्यासाठी देशोदेशींच्या राजकुमारांना <u>आमंत्रित</u> केले होते.

जनकाने स्वयंवरासाठी <u>पण</u> लावला होता. त्याच्याकडे शंकराचे धनुष्य होते. हे शिवधनुष्य अतिशय जड होते. जो हे धनुष्य उचलून त्याला <u>प्रत्यंचा</u> लावेल, त्यालाच सीता माळ घालणार होती. फारच अवघड पण होता हा.

विश्वामित्रांना स्वयंवराची <u>वार्ता</u> समजली. त्यांनी श्रीराम आणि लक्ष्मणांना मिथिलेला न्यायचे ठरवले. प्रवास करून ते मिथिला नगरीला पोहोचले. जनक राजाने त्यांचे स्वागत केले.

स्वयंवरासाठी सारे राजकुमार सभेत जमले. मध्ये शिवधनुष्य ठेवले होते. ते पाहूनच अनेक जण मनात घाबरून गेले. अनेकांनी धीर करून त्याला प्रत्यंचा लावायचा प्रयत्न केला. पण कोणालाही ते उचलता सुद्धा आले नाही.

तेव्हा श्रीराम पुढे झाला. त्याने धनुष्याला नम्रपणे वंदन केले. श्रीरामाने <u>सहजतेने</u> धनुष्य उचलले आणि त्याला प्रत्यंचा लावण्यासाठी ते वाकवले. वाकवताच मोठा आवाज झाला आणि त्या धनुष्याचे दोन तुकडे झाले. श्रीरामाने स्वयंवराचा पण जिंकला होता.

श्रीरामाच्या पराक्रमाने सारी सभा थक्क झाली. जनक संतुष्ट झाला. सीता देखील अतिशय आनंदित झाली. सीतेने श्रीरामाला माळ घातली. मोठ्या थाटाने त्यांचे लग्न झाले. राम-सीतेबरोबरच लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांचीही लग्ने झाली. त्यानंतर ते सारे अयोध्येला परत आले. दशरथ राजा, कौसल्या, सुमित्रा, कैकेयी आणि अयोध्येची प्रजा हे सारेच आनंदित झाले.

~~~

वाक्यात उपयोग करा:

आमंत्रित करणे, वार्ता समजणे, धीर करणे, सहजतेने, थक्क होणे, आनंदित होणे, थाटाने

\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_

\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_

\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_

\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_

\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_\_

Unrestricted
~~~

